सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि. रायगड-४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.com दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४६१४२०)

जा.क्र.: विससं/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०२२/२६९ दि.०२.०२.२०२२

प्रति,
प्राचार्य / शैक्षणिक संस्था प्रमुख,
सर्व अधिनस्त कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक व शारिरीक शिक्षण शास्त्र महाविद्यालये,
जि.: ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

**विषय: महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरणे तसेच संबंधित अर्जांची महाविद्यालय व विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत...**

संदर्भ: मा. संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/शिष्य 2021/डीबीटी/993, दि.01.02.2022

उपरोक्त विषयाबाबत राज्य शासनाच्या विविध विभागांच्या शिष्यवृत्ती योजनांची एकत्रितपणे अंमलबजावणी करणेसाठी विकसित केलेल्या महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या 14 शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. सदरहू योजनांसाठी दि.31.01.2022 पर्यंत ऑनलाईन अर्ज करणेसाठी मुदत देण्यात आलेली होती.

विद्यार्थी हिताच्या दृष्टीने संचालनालयाच्या संदर्भिय पत्रानुसार उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या 14 शिष्यवृत्ती योजनांसाठी सन 2020-21 करीता ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरलेले आहेत., अशा विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज त्रुटी पूर्तता करुन Re-Apply करण्यासाठी दि.28.02.2022 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच सन 2021-22 करीता ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही अर्ज भरलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांना अर्ज भरणेसाठी दि.28.02.2022 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तरी सर्व पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी मुदतीमध्ये अर्ज भरणेसाठी आपले स्तरावरुन कळविण्यात यावे. तसेच विद्यापीठ / शैक्षणिक संस्था / महाविद्यालय स्तरावरील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे, अर्ज न केल्यामुळे किंवा अर्जाची पडताळणी न झाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यापीठ / शैक्षणिक संस्था / महाविद्यालये यांचे प्रमुख / प्राचार्यांची राहील, याची नोंद घ्यावी.

**(श्री युवराज साळुंखे)**
**कनिष्ठ प्रशासन अधिकारी**
**उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल**

प्रत:
मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सादर.

Scanned by CamScanner